14 FEB 2023 क्रांतीसिंह
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, को...

# कवी देशपांडे यांची साहित्यसंपदा उपलब्ध



कोल्हापूर(प्रतिनिधी):- ज्येष्ठ साहित्यिक व कवी ग.दि. माडगूळकर यांनीच ज्यांना आपले मानसपुत्र मानले, असे येथील प्राचीन वाङ्मयाचे ज्येष्ठ अभ्यासक व कवी ना.वा. देशपांडे यांच्या ९०व्या जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाकडील त्यांची साहित्य संपदा वाचकांसाठी उपलब्ध करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि सुनंदा देशपांडे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

कवीवर्य देशपांडे यांच्या इच्छेनुसार त्यांच्या पत्नी सुनंदा यांनी त्यांची समग्र साहित्य संपदा गेल्या वर्षी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राकडे सुपूर्द केली. यामध्ये अनेक दुर्मिळ ग्रंथांचाही समावेश आहे. विद्यापीठाने या संग्रहाच्या नोंदणीचे काम पूर्ण करून आज देशपांडे यांच्या ९०व्या जयंतीनिमित्त वाचकांसाठी हा संग्रह उपलब्ध केला. विद्यापीठाच्या अर्काईव्ह कक्षामध्ये स्वतंत्र कपाटामध्ये हे साधारण ४६८ ग्रंथ ठेवण्यात आले आहेत. आज कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील, श्रीमती देशपांडे यांच्या उपस्थितीत हा लोकार्पणाचा छोटेखानी कार्यक्रम झाला. हा माझ्या आयुष्यातील सर्वाधिक हृद्य व संस्मरणीय प्रसंग असून पतीला दिलेल्या वचनाची पूर्तता केल्याचे समाधान वाटत आहे, अशा भावना सुनंदा देशपांडे यांनी व्यक्त केल्या.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प तसेच ग्रंथदेणगी प्रदान प्रसंगीचे छायाचित्र भेट देऊन देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार, प्रा. शशिकांत चौधरी, उपग्रंथपाल डॉ. पी.बी. बिलावर, सहायक ग्रंथपाल डॉ. एस.व्ही. थोरात, ए.बी. मातेकर, रविंद्र बचाटे, मदन मस्के, वसुधा वासुदेव लाटकर, स्मिता श्रीपाद देशपांडे, उषा अरविंद मिलवडीकर, अनामिका अनिल पाठक आदी उपस्थित होते.

14 FEB 2023

क्रांतीसिंह

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुदृढ व शाश्वत समाजासाठी प्रयत्न करणे गरजेचे:प्र-कुलगुरू

कोल्हापूर(प्रतिनिधी):- भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे पुन्हा स्तुति प्रशिक्षण कार्यक्रम ३० जानेवारी ते ५ फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी म्हणून भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालया अंतर्गत असणाऱ्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य यांची आभासी अर्थात ऑन लाईन पद्धतीने उपस्थिती लाभली.तसेच पुण्याच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे डॉ. पंकज पोतदार यांच्यासह, स्तुतिचे समन्वयक, प्रा. आर. जी. सोनकवडे आणि विद्यापीठातील इतर प्राध्यापक उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील हे या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवले. देशभर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरतर्फे घेण्यात येणाऱ्या स्तुती कार्यक्रमांपैकी हा २२वा आणि शिवाजी विद्यापीठात घेतला जाणारा ४था कार्यक्रम आहे.

कार्यक्रमाची सुरवात राष्ट्रगीताने झाली तर मान्यवरांनी दीपप्रज्वलन करून औपचारिक उद्घाटन केले. स्तुतिचे समन्वयक, प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तर्फे घेतलेल्या २१ स्तुती कार्यक्रमांविषयी विस्तृत माहिती दिली. हा कार्यक्रम घेण्यास सहाय्य केल्याबद्दल भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू आणि विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे मनापासून



आभार मानले.

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे डॉ. पंकज पोतदार यांनी मजास्तीत जास्त ज्ञान आत्मसात करा असा सल्ला सहभार्गींना दिला. विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य यांनी डी एसटीच्या विविध योजनांविषयी माहिती दिली. मशीनचा पुरेपूर वापर करा. असा सल्ला सहभागींना दिला. शिवाजी विद्यापीठ हे झचण खूप चांगली कामगिरी करत आहे आहे असे सांगून त्यांनी डी एस टी तर्फे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, प्रा. आर. जी. सोनकवडे,आणि स्तुति टीम ने घेतलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

शिवाजी विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नवोदित संशोधकांना संबोधताना ग्लोबल वॉर्मिंग आणि हवामान बदल हे विषय लक्षात घेऊन संशोधन करावे आणि एक सुदृढ शाश्वत समाज निर्माण होण्यासाठी प्रयत्न करावे.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सातारा, हरियाणा,मुंबई, गुजरात,पुणे,औरंगाबाद, सोलापूर, कराड, वडोदरा, गोवा इत्यादी ठिकाणाहून २१३ पेक्षा अधिक सहभागींनी नोंदणी केली होती त्यातील केवळ ५३ सहभागींना या प्रशिक्षण कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची संधी मिळाली आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये येणारे सात दिवस दिल्ली,पुणे, अमरावती, बेंगलोर अशा प्रकारे देशातील विविध शहरांतून येणाऱ्या एकूण १४ संसाधन व्यक्तींची व्याख्याने सहभागींना ऐकायला मिळतील. विविध प्रतिष्ठित संस्थां मधून येणाऱ्या तज्ञ प्राध्यापक व्याख्याते अतिशय प्रगतशील उपकरणावर तांत्रिक बाबीची माहिती सर्वांना देणार आहेत. त्याचबरोबर प्रशिक्षणाचा क्षीण घालविण्या करिता सहभागीं साठी अभ्यास सहलीचे देखील आयोजन या सात दिवसात केले आहे.

प्रथम सत्रामध्ये डॉ. पंकज पोतदार यांनी आधुनिक संशोधनामध्ये ऍटोमिक फोर्स मायक्रोस्कोप (-FM²) या उपकरणाचे महत्व पटवून दिले. त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान शास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. के. वाय. राजपुरे यांनी एक्स रे फोटो इलेक्ट्रॉन स्पेक्टरोस्कोप या अत्याधुनिक उपकरणा विषयी सविस्तर माहिती दिली.

दुसऱ्या सत्रामध्ये सर्व सहभागी शिक्षक प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांना SAIF DST CFC येथील उपकर णांचे गटानुसार प्रात्यक्षिक दिले गेले.सहभागींपैकी काहींनी आणलेले सॅम्पल देखील येथे टेस्ट करून दिले.उद्घाटन समारंभ प्रसंगी सत्यशीला धोंगडे यांनी सूत्रसंचालन केले तर शेवटी स्तुति प्रकल्पाचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

14 FEB 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ लांबणीवर

## प्रशासनाचा निर्णय : नव्या राज्यपालांच्या शपथविधीनंतर नवी तारीख शक्य

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा गुरुवारी (दि. १६) होणारा ५९वा दीक्षांत समारंभ प्रशासनाने सोमवारी लांबणीवर टाकला. काही अपरिहार्य कारणांमुळे हा समारंभ लांबणीवर टाकण्यात आल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सोमवारी जाहीर केले आहे. विद्यापीठाच्या इतिहासात पदवी प्रदान समारंभ पहिल्यांदाच पुढे ढकलण्याचा प्रकार घडला आहे.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा राजीनामा राष्ट्रपतींनी मंजूर केल्यामुळे कुलपतींच्या अध्यक्षतेखाली हा दीक्षांत समारंभ होणार नाही. नवीन राज्यपाल रमेश बैस यांचा शपथविधी होऊन ते कुलपती पदावर आरूढ होत नाहीत, तोपर्यंत हा समारंभही लांबणीवर पडला आहे.

दीक्षांत समारंभासाठी राज्यपाल कोश्यारी यांच्यासह इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल अँड रिलेशनचे अध्यक्ष, माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते. मात्र, कोश्यारी यांना निमंत्रित केल्यामुळे अगोदरच हा सोहळा वादग्रस्त बनला होता. त्यांनी राजीनामा दिल्याने वाद आपोआपच संपुष्टात आला. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी हा समारंभ नवीन तारीख निश्चित झाल्यानंतर होईल असे निवेदन सोमवारी प्रसिद्धीस दिले. समारंभाची नवीन तारीख विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

दरम्यान, या दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठाने जय्यत तयारी केली होती. ६६ हजार ४५७ पदवी प्रमाणपत्रांची छपाई पूर्ण झाली आहे. विद्यापीठ परिसराची स्वच्छता आणि रस्ता डागडुजी तसेच सुशोभीकरणाचे कामही पूर्ण झाले आहे.





शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभासाठी सोमवारी कार्यक्रमस्थळाजवळील मंडपाचे काम पूर्ण करण्यात आले होते. (छाया : नसिर अत्तार)

लोकमत

# महावीर अध्यासनास कुन्नुरे यांची देणगी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी जयपाल कुन्नुरे यांनी ४९ हजारांची बृहत देणगी भगवान महावीर अध्यासनाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली आहे.

या देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी कुन्नुरे यांचे आभार मानले. अध्यासनाच्या इमारत बांधकामास दानशूर, अहिंसा प्रेमी व्यक्ती व संस्थांनी सढळ हस्ते मदत करावी, ही देणगी आयकर सवलतीस पात्र आहे, अशी माहिती अध्यासनाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांनी दिली आहे.

लोकमत

# विद्यापीठात २५ पासून मोडी लिपी प्रशिक्षण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामार्फत २५ फेब्रुवारी ते ४ मार्च या कालावधीत मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा होणार आहे. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील मोडी पंडित मच्छिंद्र चौधरी आणि छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांचे मार्गदर्शन लाभेल.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ स्थगित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा गुरुवारी (दि. १६) होणारा ५९ वा दीक्षांत समारंभ स्थगित करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे. या समारंभास राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार होते. मात्र कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर हा समारंभ स्थगित करण्यात आला आहे. दीक्षांत समारंभाची पुढील तारीख शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.

पुढारी

# करणसिंह पाटीलला शिवाजी विद्यापीठाची तीन पारितोषिके

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वारणा कापशी (ता. शाहूवाडी) येथील करणसिंह राजेंद्र पाटील याने बी.ए.च्या पदवी परीक्षेत राज्यशास्त्र विभागात शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविला. पदवी परीक्षेसाठी असलेली विद्यापीठाची तीन पारितोषिके व शिष्यवृत्ती त्याने प्राप्त केली आहे. त्याने दादा उंडाळकर मेमोरियल प्राईज, हिंमतबहादूर चव्हाण गुरुजी पारितोषिक व प्रोफेसर वासंती रासम पारितोषिक, अशी तीन पारितोषिके मिळवली आहेत.

पुण्यनगरी

ESTD: 1962
NAAC "A++" Grade
CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 59 वा दीक्षांत समारंभाबाबत महत्त्वाचे निवेदन

शिवाजी विद्यापीठाच्या 59 व्या दीक्षांत समारंभासाठी जे स्नातक पदवी घेणार आहेत अशा सर्व स्नातक आणि संबंधित घटकांना कळविण्यात येते की, गुरुवार दि. 16 फेब्रुवारी, 2023 रोजी होणारा दीक्षांत समारंभ काही अपरिहार्य कारणास्तव स्थगित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची नवीन तारीख निश्चित झाल्यानंतर विद्यापीठाचे संकेतस्थळ (www.unishivaji.ac.in) आणि दैनिकांमधून प्रसिद्ध करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**डॉ. अजितसिंह एन. जाधव**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दीक्षांत विभाग
दि. 13/02/2023

पुण्यनगरी

# डॉ. कराडे यांच्या ग्रंथास आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर :** बाबासाहेब आंबेडकर वेल्फेअर असोसिएशन, मलेशिया व जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे आंबेडकरवादी विश्‍व साहित्य संमेलन क्वालालंपूर, मलेशिया येथे पार पडले. यामध्ये ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत, शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांना केंब्रिज, लंडन येथून प्रकाशित झालेला त्यांचा ग्रंथ 'डेव्हलपमेंट ऑफ शेड्युल्ड कास्ट ॲण्ड शेड्युल्ड ट्राईब इन इंडिया' याची १२ वी आवृत्ती प्रकाशित होत असताना आंतरराष्ट्रीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुण्यनगरी

# भगवान महावीर अध्यासनास जयपाल कुन्नुरे यांची देणगी

**कोल्हापूर :** जयपाल कुन्नुरे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी ४९ हजार रुपयांची देणगी भगवान महावीर अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली. या देणगीबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी जयपाल कुन्नुरे यांचे आभार मानले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ स्थगित

## स्नातकांना 'एसएमएस'द्वारे माहिती

**सकाळ वृत्तसेवा**



**कोल्हापूर, ता. १३ :** चारदिवसांवर असलेला शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ आज स्थगित करण्यात आला आहे. विविध प्रलंबित मागण्यांसाठी विद्यापीठीय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे परीक्षा कामकाजावर बहिष्कार आंदोलन सुरू आहे. त्यातील पुढील टप्पा असलेला एकदिवसीय लाक्षणिक संप गुरुवारी (ता. १६) आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने दीक्षांत सोहळा स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

यावर्षीच्या दीक्षांत समारंभासाठी इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशनचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे प्रमुख पाहुणे होते.

पान ११ वर ›

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ स्थगित

› पान १ वरून

माजी कुलपती तथा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी अध्यक्षस्थानी निश्चित झाले होते. यंदासाठीच्या ६६ हजार ४५७ पदवी प्रमाणपत्रांची छपाई पूर्ण झाली. गुरुवारी होणाऱ्या या समारंभाच्या निमंत्रण पत्रिकांची छपाई, तर काहींचे वितरण करण्यात आले. मंडप उभारणी, ग्रंथमहोत्सव, दिंडीचे नियोजन अशा जय्यत तयारीने वेग घेतला असताना रविवारी कोश्यारी यांचा राज्यपालपदाचा राजीनामा मंजूर झाला. त्यामुळे विद्यापीठ प्रशासन या समारंभाबाबत कोणता निर्णय घेणार, याकडे विद्यापीठ घटक, कोल्हापूरकरांचे लक्ष लागून राहिले होते. त्यातच शिवाजी विद्यापीठ

> विद्यापीठ सेवक संघाने लाक्षणिक संपाबाबतचे पत्र प्रशासनाला दिले आहे. त्या पार्श्वभूमीवर दीक्षांत समारंभ स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या बाबतची माहिती स्नातक, विद्यार्थी यांना 'एसएमएस'द्वारे दिली आहे. या समारंभाची नवीन तारीख निश्चित झाल्यानंतर जाहीर केली जाईल.
> - **डॉ. अजितसिंह जाधव**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सेवक संघाने गुरुवारी लाक्षणिक संपाबाबतचे पत्र विद्यापीठ प्रशासनाला दिले. त्यावर प्रशासनाने काही अपरिहार्य कारणास्तव समारंभ स्थगित करत असल्याचा निर्णय सायंकाळी जाहीर केला.

दरम्यान, सन २००८ मध्ये विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभासाठी तत्कालीन केंद्रीय मंत्री डी. पुरंदेश्वरी यांना प्रमुख पाहुणे म्हणून प्रशासनाने निमंत्रित केले होते. त्यांनी उपस्थितीबाबत सकारात्मकता दर्शविल्यानंतर प्रशासनाने तयारी केली. मात्र, अचानकपणे प्रमुख पाहुण्यांनी येणार नसल्याचे कळविल्याने विद्यापीठाने दीक्षांत समारंभ स्थगित केला होता.

### नव्या राज्यपालांना निमंत्रण?

शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी १३ जानेवारी रोजीच बहिष्कार आंदोलनानंतरचे पुढील टप्पे जाहीर केले होते. त्यात एकदिवसीय लाक्षणिक संपाचा देखील समावेश होता; मात्र राज्यपाल कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर झाल्याच्या दुसऱ्याच दिवशीच विद्यापीठ प्रशासनाने दीक्षांत समारंभ स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे दीक्षांत समारंभाला नव्या राज्यापालांना निमंत्रण देण्यासाठीच प्रशासनाने या संपाचे कारण पुढे केले आहे की काय, असा प्रश्न उपस्थित होत असल्याची प्रतिक्रिया 'सुटा'चे प्रमुख कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील यांनी दिली.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ स्थगित

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ १६ फेब्रुवारी रोजी होणार होता. या समारंभासाठी अध्यक्ष आणि पाहुणेही ठरले होते. विद्यापीठ प्रशासनाने मंडप उभारला होता. पदवी प्रमाणपत्र छपाईचे काम अंतिम टप्प्यात होते. एवढेच नाही तर प्रमुख पाहुणे आणि अध्यक्षांचे भाषणही छपाईला गेले होते. परंतु अचानक राज्यपालांनी राजीनामा दिल्याने दोन दिवसात पुन्हा नियमाने कुलपतींना कळवणे शक्य नाही. असे असले तरी काही अपरिहार्य कारणाने दीक्षांत समारंभ स्थगित



- **शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने परिपत्रकाव्दारे माहिती**

केला आहे. दीक्षांतची नवीन तारीख विद्यापीठाचे संकेतस्थळ व दैनिकांमधून प्रसिध्द करणार असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने परिपत्रकाव्दारे प्रसिध्द केली आहे.

पान ९ पहा

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ स्थगित

पान १ वरुन

कोरोनानंतर पहिल्यांदाच केंद्रीय पध्दतीने दीक्षांत समारंभ होणार होता. त्यामुळे विद्यापीठाने पदवी प्रमाणपत्रांची छपाई केली आहे. पाण्याची टाकी ते परीक्षा भवनपर्यंत मंडप उभारला, राजमाता जिजाऊ हॉलची सजावट केली, ग्रंथोत्सव आणि खाद्य पदार्थांच्या स्टॉलचीही उभारणी केली. परंतु कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत सोमवारी झालेल्या बैठकीत दीक्षांत समारंभ स्थगित करण्यात आला. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने केलेल्या तयारीवर पाणी पडले. स्थगित झालेल्या दीक्षांत समारंभाची नवीन तारीख जाहीर झाल्यानंतर पुन्हा नव्याने तयारी करावी लागणार आहे.

दीक्षांत समारंभाची नवीन तारीख निश्चित झाल्यावर विद्यार्थ्यांना एसएमएस, ईमेलव्दारे माहिती दिली जाणार आहे. तरी महाविद्यालये, विद्यार्थ्यांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

### विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच दीक्षांत समारंभ स्थगित

गुरूवार, १६ फेब्रुवारी रोजी शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा होणार दीक्षांत समारंभ स्थगित झाला आहे. संपूर्ण तयारी झाल्यानंतर दीक्षांत समारंभ स्थगित होण्याचा प्रकार शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच घडल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात आहे.